**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**
**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** उस्मानाबाद　　**P.S.(ठाणे):** वाशी

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0075　　**Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 19/03/2024 23:50

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगळवार　　**Date From (दिनांक पासून):** 19/03/2024

**Time Period (कालावधी):**　　**Date To ( दिनांक पर्यंत):** 19/03/2024

**Time From (वेळेपासून):** 12:28 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 16:34 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 19/03/2024　　**Time (वेळ):** 17:59 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 042

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 19/03/2024 23:07 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 0.500 किमी　　**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** वाशी,वाशी

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with CamScanner

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): समीर उर्फ पप्पु असहाबोद्दीन मुल्ला

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1973

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

Date of Issue (दिल्याची तारीख):

Place of Issue (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | डिकसळ ,ता कळंब,वाशी,उस्मानाबाद,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | डिकसळ ,ता कळंब,वाशी,उस्मानाबाद,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.):

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | संजय भिमराव गडकर | | | 1. दुय्यम निबंधक कार्यालय,वाशी, वाशी,उस्मानाबाद,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|



Scanned with CamScanner

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

-: फिर्याद :- दिनांक 19.03.2024

मी समीर ऊर्फ पप्पू असहाबोद्दीन मुल्ला, वय 38 वर्ष, व्यवसाय- वकील रा. डिकसळ ता. कळंब जि. धाराशिव मोबाईल नंबर 9503314133.

आज दिनांक 19.03.2024 रोजी वाशी येथे सुरक्षीत ठिकाणी हजर राहुन तक्रार दिली होती. त्यामधील हकिगत अशी की, " मी वरील ठिकाणचा राहणारा असुन वकीली व्यवसायासोबत दुय्यम निबंधक कार्यालयातील दस्त ऐवज लिहण्याचा व्यवसाय करित आहे.

मौजे कडकनाथवाडी ता. वाशी जि. धाराशिव येथील लिहून घेणार दिपक रामचंद्र भातलवंडे व श्वेता दिपक भातलवंडे यांच्या तर्फे मुख्त्यार म्हणून रामचंद्र एकनाथ भातलवंडे हे दिनांक 11.03.2024 रोजी दस्त ऐवज बनविण्याकरिता कळंब येथे माझ्याकडे आले व त्यांनी मला मौजे कडकनाथवाडी ता. वाशी येथील जमीन गट नंबर 234 व 236 चे दोन खरेदी खत दस्त ऐवज बनविण्यास सांगून त्यासाठी लागणारे सर्व कागदपत्रे माझ्याकडे दिली. श्री. रामचंद्र एकनाथ भातलवंडे यांनी माझ्याकडे हजर केलेल्या कागदपत्रावरून मी दोन खरेदीखत दस्त बनविले व ते घेवून दिनांक 13.03.2024 रोजी मी व माझे पक्षकार रामचंद्र एकनाथ भातलवंडे असे दुय्यम निबंधक कार्यालय, वाशी येथे गेलो व तेथे श्री. संजय गडकर, प्रभारी दुय्यम निबंधक, वाशी यांची भेट घेवून त्यांना सदर दोन्ही दस्ताचे शासकिय मुल्यांकन करून त्याप्रमाणे चलन देवून त्यांना दोन खरेदीखताचे दस्त नोंदणी करून देणेबाबत बोललो असता त्यांनी माझे पक्षकारासमक्ष माझ्याकडे दोन खरेदीखताचे दस्त नोंदणी करून देण्यासाठी प्रत्येकी 5,000/- रूपये प्रमाणे एकूण 10,000/- रूपयाची मागणी केली. त्यावेळी मी त्यांना साहेब 10,000/- रूपये जास्त होतात, ऐवढे पैसे पक्षकाराजवळ नाहीत, काहीतरी कमी करा असे म्हणालो असता त्यांनी त्यामध्ये काहीएक कमी होणार नाही. तुम्ही 10,000/- रूपये दिल्याशिवाय तुमचे खरेदीखताचे दस्त नोंदणी करून देणार नाही असे म्हणाले. तेव्हा माझे लक्षात आले की, श्री. संजय गडकर, प्रभारी दुय्यम निबंधक अधिकारी, वाशी हे त्यांना 10,000/- रूपये दिल्याशिवाय सदर खरेदीखताचे दस्त नोंदणी करून देणार नाही.

श्री. संजय गडकर, प्रभारी दुय्यम निबंधक, वाशी यांनी माझ्याकडे मागणी केलेले 10,000/- रुपये ही कोणतीही शासकीय फीस नसुन लाचच असल्याची माझी खात्री झाली आहे. श्री. संजय गडकर यांना लाच देण्याची माझी ईच्छा नाही.

आज दिनांक 19.03.2024 रोजी मी दुय्यक निबंधक कार्यालय, वाशी येथे जावून संजय गडकर, प्रभारी दुय्यम निबंधक, वाशी यांची भेट घेवुन त्यांना माझे पक्षकाराचे दोन खरेदीखताचे दस्त नोंदणी करून देण्याचे कामाबाबत बोलणार आहे. त्यासाठी त्यांनी माझ्याकडे लाचेची मागणी केल्यास त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करावी." वगैरे मजकुरची तक्रार म्हेत्रे साहेब, पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.विभाग, उस्मानाबाद यांच्याकडे दिली व त्यांनी माझी तक्रार पोहेकॉ/ उगलमुगले यांना प्रतिवेदीत केली. त्यावरुन पोहेकॉ/उगलमुगले यांनी माझी तक्रार लॅपटॉपवर टंकलिखीत करुन त्यांची प्रिंन्ट काढली. त्यानंतर त्यांनी माझी लॅपटॉपवर टंकलिखीत केलेली तक्रार व मी तोंडी सांगितलेली तक्रार एकच असल्याची खात्री झाल्यानंतर मी, त्यांनी व उपस्थित पंचांनी त्यावर सहया केल्या. त्यानंतर पोलीस उप अधिक्षक म्हेत्रे साहेब यांनी मला कळविले की, माझ्या तक्रारीचे अनुषंगाने श्री.संजय गडकर, प्रभारी दुय्यम निबंधक, वाशी यांची लाचेची मागणी आहे किंवा कसे? याबाबत त्यांची पंचासमक्ष दुय्यम निबंधक कार्यालय, वाशी येथे लाचमागणी पडताळणी करण्यात येणार असल्याबाबत खुलासा करुन लाचमागणी पडताळणी दरम्यान त्यांची लाचेची मागणी सिध्द झाल्यास लाचेचा सापळा आयोजीत करण्यात येईल असे सांगितले. तसेच त्यांनी दोन्ही पंचांची पंच म्हणुन काम करण्याची सहमती घेवुन प्रितम दिपक जाधव, कनिष्ठ अभियंता, पंचायत समिती, धाराशिव यांची पंच क्रमांक 1 म्हणुन तर अरुण भाऊराव आडे, कनिष्ठ सहाय्यक, पंचायत समिती, धाराशिव यांची पंच क्रमांक 2 म्हणुन नेमणुक केली.

त्यानंतर म्हेत्रे साहेब यांनी मला कळविले की, लाचमागणी पडताळणी दरम्यान व्हाईस रेकॉर्डरचा वापर करण्यात



Scanned with CamScanner

येणार आहे. त्यानंतर त्यांनी पोना/शेवाळे यांना दिलेल्या सुचनेप्रमाणे पोना/शेवाळे यांनी सोबत आणलेल्या एका काळया रंगाच्या बॅगमधुन व्हाईस रेकॉर्डर बाहेर काढुन त्याबाबत मला व दोन्ही पंचांना सविस्तर माहिती देवुन त्याचे प्रात्यक्षीक करुन दाखविले व एक नवीन मेमरी कार्ड व्हॉइस रेकॉर्डरमध्ये टाकुन व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन त्यामध्ये पुर्वीचे कोणतेही संभाषण रेकॉर्ड नसलेबाबत खात्री करुन दिली. त्यानंतर म्हेत्रे साहेब यांनी माझे तसेच श्री. संजय गडकर, प्रभारी दुय्यम निबंधक, वाशी यांचेत होणारे संभाषण हे व्हॉईस रेकॉर्डरमधील मेमरी कार्ड मध्ये रेकॉर्ड होणार असलेबाबत सांगितले.

त्यानंतर म्हेत्रे साहेब यांनी मला श्री. संजय गडकर, प्रभारी दुय्यम निबंधक, वाशी यांची भेट कोठे होईल ? याबाबत विचारले असता मी त्यांना श्री. संजय गडकर हे दुय्यम निबंधक कार्यालय, वाशी येथेच असुन तेथेच त्यांची भेट होईल असे सांगीतले. तेंव्हा म्हेत्रे साहेब यांनी लाचमागणी पडताळणीच्या अनुषंगाने मला सुचना दिली की, मी श्री. संजय गडकर यांची दुय्यम निबंधक कार्यालय, वाशी येथे पंचासह जावून त्यांची भेट घेवुन त्यांना आपले पक्षकाराचे दोन खरेदीखताचे दस्त नोंदणी करून देण्याचे कामाबाबत बोलावे, दरम्यान त्यांनी लाचेची मागणी केल्यास त्यांच्याकडुन वेळ मागुन घेवुन सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत यावे. तसेच त्यांनी पंचांनाही सापळा कार्यवाहीच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या.

त्यानंतर त्यांनी पोना/शेवाळे यांना दिलेल्या सुचनेप्रमाणे त्यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन माझे अंगावरील शर्टचे आतमध्ये बनियनला पिनने लावुन मला व पंच क्रं.1 जाधव यांना माझेकडील कार क्रमांक MH 12 FT 1912 मधुन सापळा पथक थांबलेल्या ठिकाणावरुन श्री. संजय गडकर, प्रभारी दुय्यम निबंधक, वाशी यांची भेट घेण्यासाठी 12.28 वा. रवाना केले. त्याप्रमाणे मी व पंच जाधव असे माझ्याकडील कारमधुन दुय्यम निबंधक कार्यालय, वाशी समोर जावुन तेथे कार बाजुला लावुन आम्ही पायी चालत दुय्यम निबंधक कार्यालय, वाशी येथे गेलो. त्यावेळी श्री. संजय गडकर, प्रभारी दुय्यम निबंधक, वाशी हे त्यांचे खुर्चीवर बसलेले होते. तेंव्हा आम्ही त्यांचे समोर असलेल्या बाकडयावर जावुन बसलो. त्यावेळी तेथे श्री. संजय गडकर, प्रभारी दुय्यम निबंधक, वाशी यांचेत व माझेत माझे पक्षकाराचे दोन खरेदीखताचे दस्त नोंदणी करून देण्याचे कामासंदर्भात बोलणे झाले. त्यादरम्यान श्री. संजय गडकर यांनी माझ्याकडे दोन खरेदीखताचे दस्त नोंदणी करून देण्यासाठी प्रत्येकी 5,000/- रुपये प्रमाणे दोन दस्त चे एकुण 10,000/- रुपये लाचेची मागणी केली. त्यानंतर मी व पंच जाधव असे त्यांचेपासुन निघुन माझेकडील कारने सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी 13.05 वा. परत आलोत.

त्यानंतर पोना/शेवाळे यांनी माझ्या जवळील व्हाईस रेकॉर्डर काढुन, बंद करुन म्हेत्रे साहेबांकडे दिला. तेव्हा म्हेत्रे साहेब यांनी मला तेथे बाजुला जावुन थांबण्याची सुचना केल्याने मी तेथे बाजुला जावुन थांबलो. त्यानंतर काही वेळाने मला म्हेत्रे साहेब यांनी त्यांचेजवळ बोलावुन घेवुन हकीकत विचारली असता मी वरील प्रमाणे घडलेली हकीकत सांगितली. त्यानंतर त्यांचे सुचनेवरुन पोना/शेवाळे यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन त्यामधील लाचमागणी संदर्भाने महत्वाचे संभाषण माझे व दोन्ही पंचासमक्ष ऐकले व संभाषणाबाबत मला व पंचांना विचारपुस केली. यावरुन माझे पक्षकाराचे दोन खरेदीखताचे दस्त नोंदणी करून देण्याचे कामासाठी श्री. संजय गडकर, प्रभारी दुय्यम निबंधक, वाशी यांनी माझेकडे 10,000/- रुपये लाचेची मागणी करुन सदरची लाच रक्कम लागलीच स्विकारणेचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले. त्यावरून म्हेत्रे साहेब यांनी माझ्याशी, पंचाशी व सापळा पथक यांचेशी विचारविनिमय करुन श्री. संजय गडकर, प्रभारी दुय्यम निबंधक, वाशी यांचेविरुध्द आज रोजी लाचेच्या सापळयाचे आयोजन करण्यात येणार असल्याचे सांगितले. त्यानंतर म्हेत्रे साहेब यांनी कळविले की, लाचेच्या नोटांना ॲन्थ्रासीन पावडर लावण्याची सापळापुर्व कार्यवाही करण्यात येणार आहे. त्यानंतर त्यांच्या सुचनेवरुन मी माझ्याजवळील सर्व रोख रक्कम व चिज वस्तु काढुन त्यांचेसमोर खाजगी वाहनाचे शिटवर ठेवल्या. मग त्यांनी ॲन्थ्रासीन पावडर लावणे, ॲन्थ्रासीन पावडरचे उपयोग, गुणधर्म व अल्ट्राव्हायलेट दिव्याचा उपयोग याबाबत आम्हास माहिती दिली. त्यानंतर त्यांचे सुचनेवरुन सपोफौ/शेख यांनी मी श्री. संजय गडकर, प्रभारी दुय्यम निबंधक, वाशी यांना देण्यासाठी आणलेल्या 500/- रुपये दराच्या 20 चलनी नोटांना ॲन्थ्रासीन पावडर लावुन त्या नोटांची खाजगी वाहनाचे दरवाजे व काचा बंद करुन केलेल्या कृत्रीम अंधारात अल्ट्राव्हायोलेटच्या लॅम्पने तपासणी करुन त्याचे सविस्तर प्रात्यक्षिक करुन दाखविले. त्यानंतर सदर नोटांची घडी सपोफौ/शेख यांनी माझे पॅन्टचे समोरील डावे बाजुचे खिशामध्ये अलगद ठेवुन दिली. त्यानंतर म्हेत्रे साहेब यांनी श्री. संजय गडकर, प्रभारी दुय्यम निबंधक, वाशी यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर डोक्यावरुन उजवा हात फिरवण्याचा ईशारा मला नेमुन दिला.

त्यानंतर म्हेत्रे साहेब यांनी मला, दोन्ही पंचाना व सापळा पथकातील सदस्यांना सविस्तर सुचना दिल्या व नंतर त्यांच्या सुचनेवरुन पोना/शेवाळे यांनी एक नवीन मेमरी कार्ड व्हॉईस रेकॉर्डरमध्ये टाकुन व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन त्यामध्ये पुर्वीचे कोणतेही संभाषण रेकॉर्ड नसलेबाबत खात्री करून दिली व त्यांनी माझे व श्री. संजय गडकर, प्रभारी दुय्यम निबधक, वाशी यांचेत होणारे संभाषण व्हॉईस रेकॉर्डरमधील मेमरी कार्ड मध्ये रेकॉर्ड होणार असलेबाबत



Scanned with CamScanner

सांगितले.

त्यानंतर म्हेत्रे साहेब यांनी मला श्री. संजय गडकर, प्रभारी दुय्यम निबंधक, वाशी यांची भेट कोठे होईल? याबाबत विचारले असता मी त्यांना श्री. संजय गडकर, प्रभारी दुय्यम निबंधक, वाशी हे दुय्यम निबंधक कार्यालय, वाशी येथेच असुन तेथेच त्यांची भेट होईल असे सांगीतले. तेंव्हा मी म्हेत्रे साहेब यांना श्री. संजय गडकर, प्रभारी दुय्यम निबंधक, वाशी यांचेकडुन अगोदर माझे पक्षाकाराचे दोन खरेदीखताचे दस्त नोंदणी करुन घेतो. त्यानंतर ते माझ्याकडुन पैसे स्विकारणार आहेत असे सांगितले.

त्यानंतर म्हेत्रे साहेब यांचे सुचनेवरुन पोना/शेवाळे यांनी सदर व्हाईस रेकॉर्डर चालु करुन माझेशर्टचे आतमध्ये असलेल्या बनियनला पीनने लावुन मी व पंच जाधव असे माझेकडील कार क्रमांक MH 12 PT 1912 मधुन सापळा पथक थांबलेल्या ठिकाणापासुन 13.39 वाजता दुय्यम निबंधक कार्यालय, वाशी येथे रवाना झालो. आमचे पाठोपाठ म्हेत्रे साहेब व सापळा पथक असे त्यांचेकडील खाजगी वाहनाने निघाले. मी व पंच जाधव असे माझ्याकडील कारमधुन दुय्यम निबंधक कार्यालय, वाशी समोर जावुन तेथे कार बाजुला लावुन आम्ही पायी चालत दुय्यम निबंधक कार्यालय, वाशी येथे गेलो. त्यावेळी श्री. संजय गडकर, प्रभारी दुय्यम निबंधक, वाशी हे त्यांचे खुर्चीवर बसलेले होते. तेंव्हा आम्ही त्यांचे समोर असलेल्या बाकडयावर जावुन बसलो. त्यानंतर श्री. संजय गडकर यांचेत व माझेत माझे पक्षकाराचे दोन खरेदीखताचे दस्त नोंदणी करुन देण्याचे कामा संदर्भाने बोलणे झाले व त्यांचेकडुन शासकीय मुल्यांकन घेवुन चलन भरले. त्यानंतर श्री. संजय गडकर, प्रभारी दुय्यम निबंधक, वाशी यांचेकडुन माझे पक्षकाराचे कडकनाथवाडी ता. वाशी जि. धाराशिव येथील दोन खरेदीखताचे दस्त नोंदणी करुन घेतले. त्यानंतर मी पक्षकारांना घेवुन दुय्यम निबंधक कार्यालय, वाशी चे बाहेर येवुन दरवाजा जवळ थांबलो. त्यानंतर थोडयावेळाने श्री. संजय गडकर, प्रभारी दुय्यम निबंधक, वाशी यांनी मला हाताने ईशारा करुन त्यांचे कार्यालयात बोलावुन पैसे देणेबाबत हाताने ईशारा केला. तेंव्हा मी माझे अंगावरील पॅन्टच्या समोरील डाव्या खिशातील 10,000 /- रुपये लाच रक्कम डाव्या हाताने काढुन त्यांचे समोर धरली असता त्यांनी सदरची लाच रक्कम उजव्या हाताने स्विकारुन ती दोन्ही हाताने मोजुन त्यांचे अंगावरील पॅन्टचे समोरील उजव्या बाजुचे वॉच पाकीटमध्ये ठेवुन दिली. त्यानंतर मी दुय्यम निबंधक कार्यालय, वाशी चे बाहेर येवुन मला नेमुन दिलेला इशारा केला ती वेळ साधारण 16.34 वाजण्याची होती. त्याचवेळी तेथे म्हेत्रे साहेब, पंच क्रमांक 2 आडे आणि सापळा पथकातील पोलीस अंमलदार हजर आले व त्यांनी श्री. संजय गडकर, प्रभारी दुय्यम निबंधक, वाशी यांना ताब्यात घेतले. त्यानंतर म्हेत्रे साहेब यांच्या सुचनेवरुन पोना/शेवाळे यांनी माझ्याजवळील व्हाईस रेकॉर्डर काढून घेवुन तो बंद केला व म्हेत्रे साहेब यांनी मला कार्यालयाचे बाहेर जावुन थांबण्याची सुचना केली. त्यावरुन मी कार्यालयाचे बाहेर जावुन थांबलो. त्यानंतर म्हेत्रे साहेब यांनी तेथे पुढील कामकाज केले व नंतर काही वेळाने त्यांनी मला तेथे बोलावुन घेतले व कार्यालयाचे खिडक्या, दरवाजे व लाईट बंद करुन कृत्रीम अंधार करुन कृत्रीम अंधारात माझ्या हातांची व अंगावरील पॅन्टच्या समोरील डाव्या बाजुच्या खिशाची अल्ट्राव्हायलेट लॅम्पव्दारे तपासणी केली असता माझे डावे हाताचे बोटाचे पेऱ्यावर व पॅन्टचे समोरील डावे बाजुचे खिशावर व आतील बाजुस ठिकठिकाणी ॲन्थ्रासीन पावडरची हिरवट रंगाची चकाकी दिसुन आली.

त्यानंतर म्हेत्रे साहेब यांनी आम्हा सर्वासमक्ष श्री. संजय गडकर, प्रभारी दुय्यम निबंधक, वाशी यांना त्यांचे संपुर्ण नावाबाबत विचारपुस केली असता त्यांनी त्यांचे नाव श्री. संजय भिमराव गडकर, वय 51 वर्षे, प्रभारी दुय्यम निबंधक, वाशी जि. धाराशिव रा. पारु नगर, जिल्हा परिषद शाळेजवळ, मुरुड ता.जि.लातुर असे असल्याचे सांगितले.

त्यानंतर म्हेत्रे साहेब यांनी तेथील प्राथमिक कामकाज करुन मला पोलीस ठाणे, वाशी येथे येणेबाबत सांगितल्याने मी पोलीस ठाणे, वाशी येथे आलो. पोलीस ठाणे, वाशी येथे म्हेत्रे साहेब यांनी दोन्ही पंचा समक्ष मला श्री. संजय गडकर, प्रभारी दुय्यम निबंधक, वाशी यांना पैसे देण्यासाठी रवाना केले पासुन ते ईशारा करेपर्यंत घटनाक्रम सांगावा अशी विचारणा केली असता, मी त्यांना वरील प्रमाणे घडलेली हकीकत सांगितली. त्यानंतर म्हेत्रे साहेब व पंचानी व्हाईस रेकॉर्डर मधील रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकले.

एकंदरीत आज दिनांक 19.03.2024 रोजी श्री. संजय भिमराव गडकर, वय 51 वर्षे, प्रभारी दुय्यम निबंधक, वाशी जि. धाराशिव रा. पारु नगर, जिल्हा परिषद शाळेजवळ, मुरुड ता.जि.लातुर यांनी माझ्याकडे माझे पक्षाकाराचे कडकनाथवाडी ता. वाशी जि. धाराशिव येथील दोन खरेदीखताचे दस्त नोंदणी करुन देण्यासाठी प्रत्येकी 5,000/- रुपये प्रमाणे एकुण 10,000/- रुपये लाच रक्कमेची मागणी करुन 10,000/- रुपये लाच रक्कम त्यांनी स्वत: स्विकारल्याने त्यांना पकडण्यात आले आहे. त्यामुळे त्यांचेविरुध्द कायदेशीर कारवाई करण्यासाठी मी माझी फिर्याद देत असुन सदरची फिर्याद लॅपटॉपवर टंकलिखीत करुन त्याची प्रिन्ट काढुन मला वाचण्यास दिली ती मी वाचुन पाहिली, ती माझे सांगणे प्रमाणे बरोबर व खरी आहे.



Scanned with CamScanner

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

RAVINDRA LIMBAJI SHINDE(I (Inspector)) / or (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): RAVINDRA LIMBAJI S
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): पोलीस ठाणे अंमलदार
पोलीस ठाणे, वाशी
जि. उस्मानाबाद



Scanned with CamScanner